**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


**वृत्तविशेष क्र.१७५** दिनांक :९ नोव्हेंबर, २००९.

## बहुचर्चित 'कंटोजिअस' प्रदर्शनाचे महापालिका आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

**ठाणे (९)** : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार प्रा. दशरथ पुजारे, प्रा. एस. के. लवाटे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे बहुचर्चित 'कंटोजिअस' प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिका आयुक्त श्री.नंदकुमार जंत्रे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. यावेळी त्यांचे हस्ते आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार डॉ. सुधीर पटवर्धन यांचा सत्कारही करण्यात आला.

दिनांक ७ नोव्हेंबर पासून ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे कला भवन येथे हे प्रदर्शन सुरु झाले आहे. या समारंभाला जहांगिर आर्ट गॅलरीच्या सेक्रेटरी श्रीमती कात्यायनी मेनन, श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे संचालक श्री. मुखर्जी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलताना महापालिका आयुक्त श्री. जंत्रे यांनी ठाणे कला भवनाच्या निर्मितीचा प्रवास सांगून ठाणे कला भवन ही ठाणे शहराच्या सांस्कृतिक शिरपेचातील एक सोनेरी वास्तू असल्याचे सांगितले.

आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार डॉ. सुधीर पटवर्धन यांनी महापालिकेने ठाणे कला भवनच्या माध्यमातून निर्माण केलेली वास्तू ठाणेकरांसाठी मोठे सांस्कृतिक संचित असल्याचे सांगितले. प्रारंभी प्रा.दशरथ पुजारे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले तर प्रा. एस. के. लवाटे यांनी आभार व्यक्त केले.

या चित्र प्रदर्शनामध्ये आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार प्रा. दशरथ पुजारे, प्रा. एस.के.लवाटे यांच्यासह त्यांचे विद्यार्थी सौ. नीना वैशंपायन, चंद्रकांत गणाचार्य, सतीश गुडेकर आणि आलोक शर्मा आदी प्रसिध्द चित्रकारांचा समावेश आहे.

---

**फोटो ओळ : १)** 'कंटोजिअस' या बहुचर्चित कला प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिका आयुक्त श्री.नंदकुमार जंत्रे यांचे हस्ते झाले. यावेळी आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार डॉ.सुधीर पटवर्धन, श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे संचालक श्री. मुखर्जी, जहांगिर आर्ट गॅलरीच्या सेक्रेटरी श्रीमती कात्यायनी मेनन, आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार प्रा. दशरथ पुजारे.

**२)** 'कंटोजिअस' चित्र प्रदर्शन पाहताना महापालिका आयुक्त श्री.नंदकुमार जंत्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे संचालक श्री. मुखर्जी, जहांगिर आर्ट गॅलरीच्या सेक्रेटरी श्रीमती कात्यायनी मेनन, आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार डॉ.सुधीर पटवर्धन.

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१७६** दिनांक : १० नोव्हेंबर, २००९.

## अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा बुलडोझर चालूच
## एकाच दिवशी केली ५ प्रभागांमध्ये कारवाई

**ठाणे (१०) :** गेल्या आठ दिवसांपासून अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा सुरु असलेला बुलडोझर चालूच असून काल शहरात एकाचवेळी ५ प्रभाग समित्यांमध्ये अनधिकृत बांधकामावर जोरदार कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

गेल्या आठ दिवसांपासून महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकांनी कारवाईचा धुमधडाका लावला असून या कारवाईमध्ये काल मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत १० अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये दोहा अपार्टमेंटजवळ, शिबलीनगर, शिळ येथील हुसैन रेहमान शेख यांचे ५०x४० मोजमापाची प्लींथ, वारेकरनगर, दिवा येथील अष्टविनायक अपार्टमेंट मधील तळ मजल्या वरील ११ व्यावसायिक गाळे, विद्यांचल अपार्टमेंट मधील तळ मजल्यावरील ११ व्यावसायिक गाळे, शंकर पाटील यांच्या आर.सी.सी.तळ अधिक २ मजली इमारतीचा समोरील भाग व ४ व्यावसायिक गाळे, खिमजी पटेल यांच्या आर.सी.सी. तळ अधिक २ मजली इमारतरीचा समोरील भाग, शैलेश पटेल यांची ५०x४० मोजमापाची प्लींथ, हिरालाल विश्वकर्मा यांची ४०x१०० मोजमापाची प्लींथ, खिमजी पटेल यांची आर.सी.सी. तळ अधिक चार मजली व्याप्त इमारतीचे तळ मजल्यावरील ४ व्यावसायिक गाळे, शैलेश पटेल यांच्या आर.सी.सी. तळ अधिक ३ मजली इमारतीचे समोरील विट बांधकाम, दिवा रेल्वे लाईनलगत उदय शेट्टी यांनी केलेले आर.सी.सी. तळ अधिक ४ मजली इमारतीचे ४० खोल्यांचे विट बांधकाम जे.सी.बी., पोकलेन मशिन व मनुष्यबळाने तोडण्याची कारवाई करण्यात आली.

कळवा प्रभाग समितीमध्येही अनधिकृत बांधकामाविरुध्द जोरदार मोहिम हाती घेण्यात आली असून या कारवाई अंतर्गत २ बांधकामे जमिनदोस्त करण्यात आली. त्यामध्ये रमेश साधू वाघमारे यांचे तळ अधिक सात मजली आर.सी.सी. इमारतीचे सातव्य मजल्याचे ३५ कॉलम, पाचव्या व सहाव्या मजल्याचे आतील विट बांधकाम, गणराज बिल्डींगच्या पाठीमागे, खारेगांव येथील राधे अशोक वराडकर यांनी केलेले तळ अधिक सहा मजली इमारतीवरील सातव्या मजल्याचे १६ आर.सी.सी.कॉलम, चौथ्या व पाचव्या मजल्याचे आतील विट बांधकाम हटविण्याची कारवाई करण्याबरोबरच खारेगांव व कळवा येथील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली.

वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत येऊर येथे नवरास हिल या हॉटेलचे संपूर्ण बांधकाम, किशोर सकपाळे यांची तळ अधिक १ मजली आर.सी.सी.इमारत व ४ बंगल्यांच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम जे.सी.बी. मशिनच्या सहाय्याने जमिनदोस्त करण्यात आले.

उथळसर प्रभाग समितीमध्येही मंगेश शंकर पाटील यांचे तळ अधिक तीन मजले, आर.सी.सी चौथ्या मजल्याचे कॉलम पोकलेन व जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विरोधी पथकाने तोडून टाकले. तर वागळे इस्टेट व रायलादेवी प्रभाग समिती अंतर्गत टप-या व हातगाडयांवर कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त बी.जी.पवार आणि त्या त्या प्रभाग समित्यांचे सहाय्यक आयुक्त यांनी पार पाडली.

---

**फोटो ओळ :** उथळसर प्रभाग समिती मधील अनधिकृत बांधकामाविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईचे छायाचित्र.

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१७७** दिनांक : ११ नोव्हेंबर, २००९.

## येऊरमध्ये अतिक्रमणविरोधी पथकाची धुव्वाधार कारवाई

### एक्झॉटिका, गोल्डन स्वॉनसह ३५ बांधकामांवर कारवाई

**ठाणे (११) :** ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने येऊरमध्ये केलेल्या जोरदार कारवाईमध्ये हॅाटेल एक्झॉटिका, गोल्डन स्वॉन आदी बडया हॉटेलसह एकूण ३५ व्यावसायिक व निवासी बांधकामांवर कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.

येऊरमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून अनधिकृत बांधकामाविरुध्दची मोहिम अधिक तीव्र करण्यात आली असून आज या कारवाईमध्ये एकूण ३५ बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये एक्झॉटिका हॅाटेल, गोल्डन स्वॉन क्लब, निसर्ग धाबा, साईश्रध्दा धाबा आदी प्रसिध्द हॉटेल्स, काही बंगले आणि व्यावसायिक बांधकामासह एकूण ३५ बांधकामांवर कारवाई करण्यात आली.

दरम्यान आजपर्यंत येऊरमध्ये अनधिकृत बांधकामाविरुध्द केलेल्या कारवाईमध्ये एकूण ९५ बांधकामे तोडण्यात आली. सदरची कारवाई अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त बी.जी.पवार, उपआयुक्त (मुख्यालय) एम.बी.पाटील यांनी सहाय्यक आयुक्त आणि महापालिका कर्मचारी यांच्या मदतीने पार पाडली.

---

**फोटो ओळ :** हॅाटेल एक्झॉटिका आणि गोर्ल्डन स्वॉन क्लब वरील अनधिकृत बांधकामाविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईचे छायाचित्र.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
email-publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१७८** दिनांक : १३ नोव्हेंबर, २००९.

## ठाणे महापालिकेची अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**ठाणे (१३) :** ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची अनधिकृत बांधकामांवरील कारवाई सुरुच असून काल विविध प्रभाग समित्यांमध्ये करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण ७ अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आली.

यामध्ये मुंब्रा येथील ४ अनधिकृत बांधकामे व नौपाडा येथील २५७ दुकानांसमोरील शेडस् व १ अनधिकृत बांधकाम तोडण्यात आली.

सदर कारवाई उप आयुक्त अतिक्रमण श्री.बी.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १७९** दिनांक : १७ नोव्हेंबर, २००९.

# नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी : महापालिकेचे आवाहन

**ठाणे (१७)** : माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये 'फयान चक्री वादळा'मुळे अवेळी पाऊस पडल्याने शहरात साथीचे रोग पसरू नयेत यासाठी महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांवर आवश्यक ती सर्व यंत्रणा आणि औषधांचा साठा सज्ज ठेवण्यात आला असून नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्याची काळजी घ्यावी आवाहन महापालिकेने या प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

या संदर्भात महापालिकेने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सात दिवसांपेक्षा जास्त दिवस साठविलेल्या किंवा साचलेल्या स्वच्छ पाण्यात, धुणी-भांडी करण्यासाठी वापरण्यात येणारे पाण्याचे उघडे ड्रम्स, घराच्या आसपास पडलेल्या नारळयाच्या करवंटया, बांधकामासाठी वापरण्यात येणारे पाण्याचे हौद, हवाबंद झाकण नसलेले हौसिंग सोसायटयांचे ओव्हरहेड टँक्स आदींमध्ये पाणी साचून डासांची निर्मिती होऊन त्यापासून मलेरिया व डेंग्यूताप होण्याची शक्यता असते.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सात दिवसांपर्यंत पाणी साठवून ठेऊ नये, साठविलेल्या पाण्याच्या ड्रम्सवर घट्ट झाकण बसवावे, सोसायटीच्या आवारात, टेरेसवर किंवा घराभोवती नारळाच्या करवंटया, वाहनांचे टायर्स, रिकामे डबे असल्यास त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी. सेप्टीक टँक त्वरीत दुरुस्त करुन घ्यावी आणि सोसायटीचा परिसर स्वच्छ ठेवावा असे आवाहन वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. आर. टी. केंद्रे यांनी केले आहे.

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१८०** दिनांक : १८ नोव्हेंबर, २००९.

# अग्निशमन दल जवानांसाठी तणावमुक्ती प्रशिक्षण

**ठाणे (१८)** : अग्निशमन विभागासाठी अधिकारी व कर्मचा-यांचे कामाचे स्वरुप विचारात घेऊन दिनांक १७ ते १९ नोव्हेंबर, २००९ या कालावधीत या विभागाकडील अधिकारी व कर्मचा-यांसाठी डॉ.सुप्रिया भदाणे व त्यांचे सहकारी केतकी साळवी यांचेमार्फत 'तणाव व्यवस्थापनाचे' (Stress Management) प्रशिक्षण ठाणे महापालिका अग्निशमन विभाग मुख्यालय, पाचपाखाडी अग्निशमन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षणात योगा, ध्यान, प्राणायम, रोजचा आहार हयाचे दैनंदिन जीवनातील महत्व, नियमितता व उपयोग याबाबत माहिती देण्यात येणार आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१८५** दिनांक : २१ नोव्हेंबर, २००९.

# शिवाईनगर मधील १० मजली इमारतीवर महापालिकेची कारवाई

**ठाणे (२१) :** ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत शिवाईनगर येथील १०मजली अनधिकृत इमारतीवर आज महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांच्या आदेशान्वये कारवाई केली.

आज सकाळपासून सुरु असलेल्या या कारवाईमध्ये या १० मजली अनधिकृत इमारतीच्या सातव्या, आठव्या, नवव्या व दहाव्या मजल्याचे संपूर्ण स्लॅब तोडून टाकण्यात आले, तर टेरेसवरील कॉलम व पाण्याची टाकीही या कारवाईमध्ये तोडून टाकण्यात आली.

सदरची कारवाई उपआयुक्त (मुख्यालय) एम.बी.पाटील, सहाय्यक आयुक्त मनिष जोशी, कार्यकारी अभियंता अनिल भिरुड यांनी महापालिका कर्मचारी यांच्या मदतीने पार पाडली.

---

**फोटो ओळ :** शिवाईनगर येथील अनधिकृत इमारतीविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईचे छायाचित्र.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१८६** दिनांक : २१ नोव्हेंबर, २००९.

# ‘तो’ अपघात नव्हता; एमएमआरडीएचा खुलासा

**ठाणे (२१) :** आज सकाळी कोपरी (पूर्व) येथील स्कायवॉक बांधकामाचा पडलेला भाग हा अपघात नव्हता तर त्या बांधकामाचा खराब झालेला भाग आम्ही स्वतः काढून घेतल्याचा खुलासा महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त मुख्य अभियंता ए. के. पहल यांनी केला आहे.

आज सकाळी घटनास्थळी त्यांनी भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी केली. या संदर्भात त्यांनी हा अपघात नसून काँक्रीट मिक्स मध्ये उशीर झाल्यामुळे सिमेंट घट्ट झाले व ते बांधकामासाठी वापरणे योग्य नसल्याचे लक्षात आल्याने तो भाग पाडून टाकण्यात आला असल्याचे स्पष्ट केले.

तथापि या प्रकल्पाचे काम पाहणा-या सर्व संबंधितांना भविष्यात कुठलाही अपघात होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१८७** दिनांक : २३ नोव्हेंबर, २००९.

# ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा 'अविष्कार-२००९' आजपासून कला भवन येथे भव्य प्रदर्शनाचे आयोजन

**ठाणे (२३) :** ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि फोटो सर्कलच्या सहकार्याने आयोजित 'अविष्कार २००९' ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्यापासून ठाणे शहराचा लॅण्डमार्क असलेल्या ठाणे कला भवनमध्ये आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २४ नोव्हेंबर, २००९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता शिवसेना ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होत आहे.

या समारंभास महापौर सौ. स्मिता इंदुलकर, ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री.मा.य.गोखले, उपमहापौर अशोक भोईर, स्थायी समिती सभापती चंद्रगुप्त घाग, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे, क्रीडा समिती सभापती राम एगडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच या स्पर्धेचा समारोप समारंभ २९ नोव्हेंबर, २००९ रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणार असून या समारंभाला ज्येष्ठ विधिज्ञ व आंतरराष्ट्रीय वन्यजीव छायाचित्रकार ॲड. अधिक शिरोडकर उपस्थित राहणार आहेत. तरी ठाणे कला भवन येथे होणा-या 'अविष्कार-२००९' या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठया संखेने उपस्थित राहावे असे आवाहन ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्यावतीने करण्यात आले आहे.

दरम्यान हया निमित्ताने भारतीय ऐतिहासिक स्थळे, भारतीय लोककला, भारतीय सण आणि उत्सव आणि ठाणे जिल्हयासाठी मुक्त विषयावर छायाचित्र स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे.

**भारतीय ऐतिहासिक स्थळे :**परेश पराडकर - प्रथम, समीर मोहिते - द्वितीय, अविनाश कोळवणकर - तृतीय, उत्तेजनार्थ - अलोलिका चव्हाण, दिपेश शहा.

**भारतीय लोककला :** सुभाष आव्हाड - प्रथम, समीर मोहिते - द्वितीय, समीर मोहिते - तृतीय, उत्तेजनार्थ - जगदिश बर्वे, नीरज भांगे.

**भारतीय सण आणि उत्सव :** राहुल सुर्वे - प्रथम, सुजीत म्हात्रे - द्वितीय, संजय हडकर - तृतीय, उत्तेजनार्थ - गणेश अंबोकर, राहुल सुर्वे.

**मुक्त विषय (ठाणे जिल्हा राखीव) :** संजय नाईक - प्रथम, दिपक देशमुख - द्वितीय, हृदयनाथ कोळी - तृतीय, उत्तेजनार्थ - वेदवती पडवळ, समीर जाधव.

---

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१८८** दिनांक : २३ नोव्हेंबर, २००९.

## मुंब्र्यात ४ तर , कळवा प्रभागात ५ अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई

**ठाणे ( २३ )** : मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर करण्यात आलेल्या कारवाईत चर्नीपाडा रोड, रशिद कंपाऊंड, कौसा येथे साजिद मन्सुरी यांनी केलेले तळ अधिक ४ मजली अनधिकृत इमारतीमधील तिस-या मजल्याचे आतील विट बांधकाम, चौथ्या मजल्याचे ५ कॉलम व १ स्लॅब, अनिस हाजी यांचे तळ अधिक एक मजली अनधिकृत इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील १७ कॉलम, समीर हुंडेकर यांच्या तळ अधिक एक मजली अनधिकृत इमारतीच्या पहिल्या मजल्याचे ६ रुमचे विटबांधकाम, ७ कॉलम, ५ स्लॅब, अख्तर शेख यांनी केलेले तळ मजल्यावरील ७ खोल्यांचे विट बांधकाम व २ स्लॅब, वाहिद खान यांचे कच्च्या झोपडयाचे फ्रेम व पत्रे गॅस कटर व मनुष्यबळाने तोडण्यात आले.

सदरची कारवाई अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त बी.जी. पवार, मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त घनश्याम थोरात व महापालिका कर्मचा-यांनी पार पाडली.

दरम्यान कळवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकाम विरोधी कारवाईत स्टेशन रोड येथील अनंत महादू म्हात्रे यांनी केलेले तळ अधिक सहा मजली अनधिकृत इमारतीच्या सहाव्या मजल्याचे ७ स्लॅब, तिस-या व चौथ्या मजल्याचे विट बांधकाम, सुर्यनगर, पटणी कॉम्प्युटर्स जवळ, विटावा येथे दिपक पाटील यांनी केलेले ४०x६० मोजमापाचे आर.सी.सी. प्लींथचे बांधकाम व स्मशानभूमी, सुर्यनगर येथील बांधकामाचे आर.सी.सी कॉलम व संपूर्ण विट बांधकाम, संजय मोकाशी यांचे ४०x३० मोजमापाच्या तळ अधिक ३ मजली इमारतीमधील तळ मजल्याचे ४ दुकान गाळे, पहिल्या मजल्याचे ४ स्लॅब व विट बांधकाम, दुस-या मजल्याचे संपूर्ण विट बांधकाम, तिस-या मजल्याचे आर.सी.सी. कॉलम व ७ स्लॅब, जानकीनगर सर्व्हे नं.१७ शासकीय जागेवरील ४ दगडी फाऊंडेशन गॅस कटर, जे.सी.बी. व मनुष्यबळाच्या सहाय्याने तोडण्याची कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे ४० पोस्टर्स/बॅनर्स, ८ हातगाडया हटविण्याची कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त बी.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त साहेबराव मराठे मंगल शिंदे, प्रभाग अधिकारी आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडील कर्मचा-यांनी पोलिस बंदोबस्तात पार पाडली.

---

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१८९** दिनांक : २४ नोव्हेंबर, २००९.

## 'प्रभाग अधिकारी' पदाची लेखी परिक्षा पुढे ढकलली
## १३ डिसेंबर रोजी होणार परिक्षा

**ठाणे (२४)** : ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'प्रभाग अधिकारी' या पदासाठी शनिवार दिनांक २८ नोव्हेंबर, २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता न्यु इंग्लिश स्कूल/न्यु गर्ल्स स्कूल, ठाणे येथे होणारी लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून ती आता दिनांक १३ डिसेंबर, २००९ रोजी दुपारी २.०० वाजता ठाणे महानगरपालिका शाळा क्र.१२०, सावरकरनगर, वागळे इस्टेट, पाण्याच्या टाकीजवळ, ठाणे (पश्चिम) येथे घेण्यात येणार असल्याचे कार्मिक अधिकारी श्रीमती वर्षा दिक्षीत यांनी कळविले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


**वृत्तविशेष क्र.१९०** दिनांक : २४ नोव्हेंबर, २००९.

# दोन प्रभागात अतिक्रमण कारवाई

**ठाणे (२४)** : ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत शिवाईनगर येथे अमित क्षीरसागर यांच्या मालकीच्या दहा मजली इमारतीवर अतिक्रमण विभागाची कारवाई सुरुच असून आज या इमारतीच्या दहाव्या मजल्यावरील कॉलम गॅस कटरच्या सहाय्याने तोडण्याची कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई महापालिका आयुक्त श्री. नंदकुमार जंत्रे यांच्या आदेशान्वये उपआयुक्त (मुख्यालय) श्री.एम.बी.पाटील यांनी सहाय्यक आयुक्त मनिष जोशी यांच्या सहाय्याने केली.

दरम्यान उथळसर प्रभाग समितीतंर्गत महावीर उमंग सोसायटीमधील श्री. गाला यांची पहिल्या मजल्यावरील वेदर शेडस् तोडून टाकण्यात आले. सदरची कारवाई सहाय्यक आयुक्त सौ.गीता कुलकर्णी यांनी केली.

---

**फोटो ओळ :** शिवाईनगर येथील अनधिकृत इमारतीविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईचे छायाचित्र.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१९१** दिनांक : २६ नोव्हेंबर, २००९.

# रेल्वे प्रशासन महापालिकेस संपूर्ण सहकार्य करणार
# रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना महापालिकेचे शिष्टमंडळ भेटले

**ठाणे (२६)** : ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये रेल्वे प्रशासनाशी संबंधित असलेले प्रस्ताव पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासन शंभर टक्के सहकार्य करील असे आश्वासन रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री.बी.बी.मोदगील यांनी शिवसेना नेते व ठाणे जिल्हा संपर्क नेते आमदार सुभाष देसाई यांच्यासह शिवसेना ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, आमदार राजन विचारे व महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे आदींचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाला दिले.

ठाणे महापालिका हद्दीतील रेल्वे प्रशासनाशी संबंधित असलेले अनेक प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबीत आहेत. यामध्ये कोपरी ब्रीज, विटावा ब्रीज, ऐतिहासिक ठाणे स्टेशन नुतनीकरण, दिवा आणि बी-केबीन येथील रेल्वे क्रॉसिंग ब्रीज अशा प्रस्तावांचा समावेश आहे. हे प्रस्ताव तातडीने पूर्णत्वास जावेत यासाठी आज शिवसेना नेते व ठाणे जिल्हा संपर्क नेते आमदार सुभाष देसाई यांच्यासह शिवसेना ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, आमदार राजन विचारे, महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे, नगर अभियंता के.डी. लाला आदींनी महाव्यवस्थापक बी.बी.मोदगील यांची भेट घेतली. या भेटीत श्री.मोदगील यांनी महापालिकेला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. विशेषतः कोपरी ब्रीजसाठी तातडीने कार्यवाही करण्यासंदर्भात रेल्वे मदत करील. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेल्या विटावा ब्रीजच्या कामास दहा दिवसात सुरुवात होईल असे श्री. मोदगील यांनी सांगितले.

बी-केबीन येथे ठाणे पूर्व-पश्चिम भाग जोडणारा पूल तसेच दिवा येथील रेल्वे क्रॉसिंग ब्रीज आदी प्रस्ताव तातडीने मार्गी लावले जातील असेही या बैठकीत आश्वासन देण्यात आले.

देशातील पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाणे दरम्यान धावली. मात्र ऐतिहासिक ठाणे शहर अद्यापही आधुनिक सोयीसुविधांपासून वंचीत असल्याचे निदर्शनास आणून देताच श्री. मोदगील यांनी ठाणे शहराचा दर्शनी भाग सुधारणे, दोन पादचारी मार्ग उभारणे या कामांबरोबरच प्लॅटफॉर्मची उंची वाढविणे आदी कामांना प्राधान्य देण्यात येईल. किंबहूना येत्या आठ महिन्यात ठाणे स्टेशनचा चेहरामोहरा बदलल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळेल असे आश्वासन श्री. मोदगील यांनी दिले.

या बैठकीला महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रविण पापळकर तसेच रेल्वेचे अधिकारी आणि अभियंते उपस्थित होते.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१९२** दिनांक : २७ नोव्हेंबर, २००९.

## मुंब्र्यात ३ अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई

**ठाणे (२७)** : मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर करण्यात आलेल्या कारवाईत वफा पार्कच्या मागे, कौसा येथे शोहेल शेख यांनी केलेले तळ अधिक १ मजली अनधिकृत इमारतीचे संपूर्ण बांधकाम, झुबेर मुल्ला यांच्या तळ अधिक दोन मजली अनधिकृत इमारतीच्या दुस-या मजल्यावरील ८ स्लॅब व इम्रान चौधरी यांच्या तळ अधिक १ मजली अनधिकृत इमारतीच्या तळ मजल्याचे व पहिल्या मजल्यावरील कॉलमचे बांधकाम पोकलेन मशिन, गॅस कटर व मनुष्यबळाने तोडण्यात आले.

सदरची कारवाई मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त घनश्याम थोरात, प्रभाग अधिकारी, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता व महापालिका कर्मचा-यांनी पोलिस बंदोबस्तात पार पाडली.

---

ठाणे महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१ ९ ३** दिनांक : २७ नोव्हेंबर, २००९.

# राज्याचे माजी मुख्य सचिव श्री.देशमुख यांची कला भवनला भेट
# महापालिकेच्या उपक्रमाचे केले कौतुक

**ठाणे (२७)** : राज्याचे माजी मुख्य सचिव व छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालयाचे अध्यक्ष श्री.बी.डी.देशमुख यांनी आज कला भवनला भेट देऊन महापालिकेच्या लोकाभिमुख प्रकल्पांचे कौतुक केले. यावेळी त्यांच्यासमवेत महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे आणि पालिकेचे इतर अधिकारी उपस्थित होते.

आज सकाळी श्री. देशमुख यांनी ठाणे कला भवन वास्तूला भेट देऊन ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्यावतीने आयोजित महापौर चषक छायाचित्र प्रदर्शनास भेट दिली. यावेळी महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांनी श्री. देशमुख यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी, कार्यकारी अभियंता संजय देशमुख, कला भवनचे व्यवस्थापक महेश राजदेरकर, उप अभियंता रवि शिंदे, आर्ट क्युरेटर श्रीमती शर्मिला आदी उपस्थित होते.

**फोटो ओळ :** ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शन पाहताना श्री.बी.जी.देशमुख सोबत महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे, कला भवनचे व्यवस्थापक महेश राजदेरकर व इतर.

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१९४** दिनांक : ३० नोव्हेंबर, २००९.

## वागळे इस्टेट प्रभागात अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई

**ठाणे (३०)** : ठाणे महानगरपालिकेच्या वागळे इस्टेट प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर करण्यात आलेल्या कारवाईत हाजुरी गांव, शिवसेना शाखेच्या मागे संतोष बबन थोरात यांनी केलेले तिस-या मजल्याच्या कॉलमचे स्टील, दुस-या मजल्याचे ३ आर.सी.सी.स्लॅब, ३ कॉलम व ४ सदनिकांचे संपूर्ण वीट बांधकाम, पहिल्या मजल्यावरील २ आर.सी.सी.स्लॅब, ४ सदनिकांचे संपूर्ण वीट बांधकाम, तळ मजल्यावरील २ आर.सी.सी.स्लॅबचे बांधकाम व जिन्याचे बांधकाम, किसननगर नं.३, रोड नं.१६, भटवाडी येथील मोहन पांडुरंग पाटील यांचे तिस-या मजल्याचे सेंट्रींग, २० आर.सी.सी.कॉलम, दुस-या मजल्यावरील १४ आर.सी.सी.कॉलम, २ स्लॅब व ८ सदनिकांचे वीट बांधकाम, पहिल्या मजल्यावरील सर्व सदनिकांचे संपूर्ण वीट बांधकाम गॅस कटर व मनुष्यबळाने तोडण्यात आले. तसेच रोड नं.२२ फेरोडाय इण्डस्ट्रीयल कंपनी समोरील १०x१० मोजमापाचे गाळयाचे अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त बी.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वागळे इस्टेट प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त सौ. छाया मानकर, प्रभाग अधिकारी व महापालिका कर्मचा-यांनी पार पाडली.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१९५** दिनांक : ३० नोव्हेंबर, २००९.

## शहीद जवानांच्या वारसांना मिळाला विम्याचा धनादेश

### महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांचे हस्ते वाटप

**ठाणे (३०)** : ऐन दिवाळीत तारांगण गृहसंकुलामध्ये लागलेली आग विझवताना शहीद झालेल्या ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना भारतीय जीवन बीमा निगमच्यावतीने देण्यात येणा-या विम्याच्या रकमेचे धनादेश आज महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी आमदार राजन विचारे, भारतीय जीवन बीमा निगमचे ठाणे विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक सुनील कुमार ठाकूर, वरिष्ठ शाखा व्यवस्थापक ऋता आजगांवकर, मुख्य अग्निशमन अधिकारी विजय वैद्य आदी उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिकेने अग्निशमन दल जवानांचा आयुर्विमा उतरविला असून त्यामुळे शहीद झालेल्या सहा जवानांच्या वारसांना आज एकूण ३० लाख रुपयांचे धनादेश महापालिका आयुक्त श्री.जंत्रे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यामध्ये श्रीमती सुनीता जमादार, श्रीमती कविता काळे, श्रीमती प्रमिला ठाणेकर, नीरज सिंग, श्रीमती स्नेहा शिंदे व श्रीमती शकुंतला पाटील आदींचा समावेश होता.

भारतीय जीवन बीमा निगमद्वारे मिळालेल्या हया रकमेची आपण आपल्या मुलांच्या भविष्यासाठी योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी असा सल्लाही महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांनी दिला.

---

**फोटो ओळ :** ठाणे महानगरपालिकेच्या शहीद जवानांच्या वारसांना भारतीय जीवन बीमा निगमच्यावतीने विम्याच्या रक्कमेच्या धनादेशाचे महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावेळी आमदार राजन विचारे, मुख्य अग्निशमन अधिकारी विजय वैद्य, भारतीय जीवन बीमा निगमचे ठाणे विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक सुनील कुमार ठाकूर, वरिष्ठ शाखा व्यवस्थापक ऋता आजगांवकर, एजंट राजन मोकाशी आदी मान्यवर उपस्थित होते.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. १ ९ ६** दिनांक : १डिसेंबर, २००९.

## कामगारांना वेठीस धरणार नाही

### पण बेशिस्तपणा खपवून घेणार नाही; महापालिका आयुक्तांचा इशारा

**ठाणे ( १ )** : महापालिकेच्या कर्मचा-यांना पगार न देण्याच्या नावांखाली प्रशासन कर्मचा-यांना कधीही वेठीस धरणार नाही. पण कोणत्याही परिस्थितीत बेशिस्तपणा खपवून घेतला जाणार नाही असा इशारा महापालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांनी आज पत्रकार परिषदेत दिला. दरम्यान या कृत्यात सहभागी होणा-या आणि त्यास चिथावणी देणा-यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेशही महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

कर्मचा-यांना पगार देणार नाही असा कोणताही निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला नसतानाही महापालिकेच्या काही कर्मचा-यांनी आज दुपारी १२.३० वाजल्यापासूनच महापालिका आयुक्तांच्या दालनासमोर घोषणाबाजी सुरु केली. महापालिकेच्या पगाराचे वाटप हे साधारणतः दुपारी १.०० वाजल्यापासून होते, असे असतानाही त्या आधीपासूनच ही घोषणाबाजी सुरु असल्याची गोष्ट शिस्तीला धरुन नाही असेही महापालिका आयुक्त श्री. जंत्रे यांनी यावेळी स्पष्ट केले.

वस्तुतः महापालिका भवनाच्या २०० मीटर परिसरात घोषणाबाजी करण्यास मनाई असतानाही तो आदेश धुडकावून कर्मचा-यांनी जो बेशिस्तपणा दाखविला आहे तो बेकायदेशीर असून त्यांच्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई होईल असेही महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

दरम्यान या प्रकरणी ज्या कर्मचा-यांचा कुठलाही दोष नाही त्यांना तातडीने उदया पगार देण्याचे आदेशही महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

---


**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


---

**वृत्तविशेष क्र.१९७** दिनांक : १ डिसेंबर, २००९.

## ठाणे शहरात गुरुवार ऐवजी मंगळवारी पाणी कपात

**ठाणे (१)** : महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत केलेल्या पाणी कपातीच्या दिवसांमध्ये बदल केल्यामुळे स्टेम प्राधिकरणामार्फत ठाणे शहरास होणारा पाणी पुरवठा आता गुरुवार ऐवजी मंगळवारी होणार आहे. त्यामुळे मंगळवार रात्रौ १२.०० ते बुधवार रात्रौ १२.०० पर्यंत ही कपात लागू होणार आहे. या कालावधीत ठाणे शहराचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तसेच पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याने नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणी पुरवठा विभागाने या प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१९८** दिनांक : ३ डिसेंबर, २००९.

## अशोक वैती ठाण्याचे १५वे महापौर तर मनोज लासे १९वे उपमहापौर

**ठाणे (३)** : ठाणे महानगरपालिकेचे १५वे महापौर म्हणून शिवसेना-भाजपा युतीचे उमेदवार अशोक बारकू वैती हे आज ६३ विरुध्द १ मतांनी विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे उमेदवार नजीब

मुल्ला यांना १ मत मिळाले तर ४८ नगरसेवकांनी मतदान केले नाही. उपमहापौर पदाच्या निवडणूकीत सेना-भाजपा युतीचे उमेदवार मनोज विठ्ठल लासे हे ६३ मते मिळवून विजयी झाले. पीठासीन अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कोकण विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी ए.एल.ज- हाड यांनी काम पाहिले.

आज सकाळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात निवडणूक अधिकारी ए.एल.ज-हाड यांनी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात केली. प्रारंभी महापौर पदाच्या निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाली. निवडणूक अधिका-यांनी आपली उमेदवारी मागे घेण्याकरीता १५ मिनिटांचा वेळ दिला. परंतू कोणीही आपली उमेदवारी मागे न घेतल्याने शेवटी हात उंचावून मतदान घेण्यात आले. यामध्ये सेना-भाजपा युतीचे उमेदवार अशोक वैती यांना ६३ मते पडली. तर प्रतिस्पर्धी उमेदवार नजीब मुल्ला यांना १मत मिळाले. यावेळी ४८ नगरसेवकांनी मतदान केले नाही. शेवटी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी ए.एल.ज-हाड यांनी अशोक वैती ६३ मतांनी निवडून आल्याचे जाहिर केले.

उपमहापौर पदाच्या निवडणूकीतही आवाजी पध्दतीने मतदान घेण्यात आले. यामध्ये युतीचे उमेदवार मनोज लासे यांना एकूण ६३मते पडली. तर यावेळीही आघाडीच्या सदस्यांनी मतदान न करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान नवनिर्वाचीत उपमहापौर अशोक वैती व उपमहापौर मनोज लासे यांचे मावळत्या महापौर सौ.स्मिता इंदुलकर यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तर उपमहापौर अशोक भोईर, स्थायी समिती सभापती चंदगुप्त घाग, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे आदी मान्यवरांनी नवनिर्वाचीत महापौर व उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१९९** दिनांक : ३ डिसेंबर, २००९.

## ‘प्रभाग अधिकारी’ पदाची लेखी परिक्षा १३ डिसेंबर रोजी

**ठाणे ( ३ )** : ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ‘प्रभाग अधिकारी’ या पदासाठी शनिवार दिनांक २८ नोव्हेंबर, २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता न्यु इंग्लिश स्कूल/न्यु गर्ल्स स्कूल, ठाणे येथे होणारी लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून ती आता रविवार दिनांक १३ डिसेंबर, २००९ रोजी दुपारी २.०० वाजता ठाणे महानगरपालिका शाळा क्र.१२०, सावरकरनगर, वागळे इस्टेट, पाण्याच्या टाकीजवळ, ठाणे (पश्चिम) येथे घेण्यात येणार असल्याचे कार्मिक अधिकारी श्रीमती वर्षा दिक्षित यांनी कळविले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

Publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. २००** दिनांक : ३ डिसेंबर, २००९

# कळवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात फेरीवाले, बॅनर्स/पोस्टर्सविरुध्द कारवाई

**ठाणे ( ३ ) :** ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी फेरीवाल्यांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. या कारवाई अंतर्गत कळवा मार्केट, कळवा नाका ते खारेगांव व खारेगांव नाका ते पारसिक रेतीबंदर या परिसरातील एकूण २ हातगाडया जप्त करण्याबरोबरच एकूण १५ बॅनर्स व १८ पोस्टर्स हटविण्याची कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त साहेबराव मराठे, प्रभाग अधिकारी आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडील कर्मचा-यांनी पार पाडली.

---